<u>आदेश</u>

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६ मे २००२

<u>मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८</u>

क्रमांक :मुद्रांक - २००२/८७५/प्र.क्र.१७३/म-१; मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (मुंबई १९५८ चा ६०) (यानंतर ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करता येईल) च्या कलम ९ च्या पोटकलम (अ) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन या आदेशाद्वारे दिनांक १ मे,२००२ पासून गृह कर्जाच्या संदर्भात निष्पादीत करण्यात येणा-या गहाणखताच्या दस्तांवर संबंधित दस्तासोबत बँकेचे मंजूरी पत्र असेल व संबंधित दस्तऐवजात कर्जाचा हेतू स्पष्टपणे नमूद केलेला असेल अशा दस्तांच्या बाबतीत उक्त अधिनियमाच्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद ३३ (ब)(२), अनुच्छेद ४० (ब) व अनुच्छेद ५४ (२) अन्वये देय असलेले मुद्रांक शुल्क प्रती ५०० रुपयास अथवा त्याच्या भागास दोन रुपये पन्नास पैसे एवढया मर्यादेपर्यन्त कमी करत आहे.

स्पष्टीकरण : या आदेशाच्या प्रयोजनार्थ ,-

(अ) " बँक " या संज्ञेमध्ये सार्वजनिक उपक्रमातील बँका गृह कर्ज देणा-या वित्तीय संस्था सहकारी बँका आणि गृह कर्जामध्ये काम करणा-या अनूसूचित बँकेचा समावेश आहे;

(ब) "गृह कर्ज " या संज्ञेत घर खरेदीसाठी, दुरुस्तीसाठी अथवा त्याच्या बांधकामासाठी किंवा गृह योजनेच्या कामासाठी अथवा निवासी प्रयोजनार्थ खरेदी केलेली जमीन याकरीता दिलेले कर्ज अथवा अग्रिम याचा समावेश आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रमाकांत अस्मर )
शासनाचे सहसचिव

9c/15

# ORDER

Revenue and Forests Department
Mantralaya, Mumbai 400 032.
Dated the 6th May 2002.

Bombay Stamp Act 1958

No. Mudrank-2002/875/C.R. 173-M-1, In exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), and in supersession of Government notification, Revenue and Forests Department No. STP.1094/C.R. 369/(c).M-1, Dated the 11th May 1994, the Government of Maharaslra hereby reduces with effect from 1st May 2002, the duty with which in instrument of securitisation of loans or of Assignment of Debt with underlying securities is chargeable under clause (a) article 25 of Schedule I to the said Act, to fifty paise for every five hundred rupees or part thereof, of the loan securitised or debt assigned with underlying securities, subject to maximum of rupees one lakh, and in case of instrument of Assignment of Receivables in respect of use of credit cards to two rupees and fifty paise for every five hundred rupees or part thereof.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Ramakant Asmar)
Joint Secretary to Government